# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.

कार्यालय- विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,अमरावती.

महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय विभागाच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत. या योजनेच्या माध्यमातुन मागासवर्गीय घटकांचा आर्थिक , सामाजिक व शैक्षणिक विकास साद्य करून विकासापासुन वंचित असणारे घटक समाजाचे मुख्य प्रवाहात आणुन त्याचा विकास साध्य करणे व हा घटक मानसन्मानाने जिवन जगणे करीता प्रवृत्त करणे हा या खात्याचा मुख्य उददेश आहे. त्याच अनुषंगाने खालील प्रमाणे विविध योजना राबविल्या जातात.

1) मागासवर्गीय मुलामुलींकरीता शासकीय वसतिगृह चालविणे यामध्ये १००० मुलांचे विभागीय स्तरावर वसतिगृह उघडणे व तसेच जिल्हास्तरावर १०० विद्यार्थी क्षमता असणारे वसतिगृह उघडणे.
2) घरकुल योजना राबविणे-
3) १०० मुलामुंलींकरीता अनुजातीच्या निवासी आश्रमशाळा उघडणे.
4) अनु जाती उपयोजना .
5) सावित्रिबाई फुले शिष्यवृत्ती योजना.
6) भारत सरकार ची शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना.
7) राजर्षी छत्रपती शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना व पुरस्कार .
8) सैनिकी शाळेतील अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता..
9) अनुसुचित जातीच्या मुला मुलींकरीता परदेशात उच्च शिक्षणाकरीता शिंष्यवृत्ती योजना.
10) विभागीय स्तरावर अनुसुचित जातीचे मुला मुलींसाठी औद्योगीक प्रशिक्षण संस्था.
11) दलित वस्ती सुधार योजना.(शहरी /ग्रामिण).
12) कर्मविर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना.
13) अनुसुचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थ सहाय्य योजना.
14) अनुसुचित जातीच्या अल्पभुधारकांना पॉवर टिलर वाटप योजना.
15) अनुसुचित जातीचे गटई कामगारांना पत्राचे स्टॉल वाटप योजना.
16) कन्यादान योजना. व आंतरजातीय विवाह योजना.
17) स्वयंसेवी संस्थे मार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय अनुदानीत वसतीगृहांना सहाय्यक अनुदान योजना.
18) व्यसन मुक्ती प्रचार कार्य योजना.
19) अपंग कल्याण योजना.
20) अत्याचारास बळी ठरणाऱ्या अनुसुचित जाती व जमातीचे कुटुंबातील सदस्यांना अर्थ सहाय्य योजना
21) शाहु फुले आंबेडकर दलितवस्ती पुरस्कार योजना.

या प्रमाणे या विभागा मार्फत योजना राविण्यात येत आहे.

योजनां बाबत संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे.

**१. शासकीय वसतिगृह-**

मागासवर्गीय समाजातील आर्थिक दृष्टयादुर्बल असणारे घटकांतील मुले मुली शिक्षंणासाठी प्रवृत्त व्हावी तसेच त्यांना उच्च शिक्षण घेता यावे या करीता शासकीय वसतिगृहाची निर्मिती करण्यात आलेली आहे. या वसतिगृहामधुन अनेंक डॉक्टर्स,इंजिनिअर्स, प्राद्यापक , वकील तसेच आ.ए.एस., आय.पी.एस. अधिकारी वसतीगृहाची सुविध असल्यामुळे निर्माण होत आहे.

अमरावती जिल्हयात एकुण १६ वसतिगृहे चालविले जातात त्यामध्ये ८ मुलांची व ८ मुलींचे वसतिगृह कार्यरत आहे. तसेच जिल्हास्तरावर २ मुलांची व २ मुलींचे वसतिगृह सुरु आहेत. शासनाने सन २००९-१० मध्ये विभागीय स्तरावर १००० मुलांचे वसतिगृह सुरु करण्यास मंजुर प्रदान केलेली आहे व या बाबत इमारतीचे बांधकाम सुध्दा सुरु आहे. या बाबत इमारतीचा नकाशा सोबत दर्शविण्यात आलेला आहे.

या वसतिगृहात अनुसुचित जाती जमातीचे तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटक तसेच विजाभज विद्यार्थ्यांना जे आर्थिक दृष्टया दुर्बल आहे त्यांना गुणानुक्रमे प्रवेश दिला जातो व या प्रवेशाकरीता इ.८ वी ते १२ पर्यत विद्यार्थी पात्र असुन त्यांनी निकाल लागल्या पासुन १५ दिवसाचे आंत प्रवेश अर्ज सबंधित वसतिगृहात भरावयाचा असतो.त्या वसतिगृहात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भोजन, निवास व शैक्षणिक सुविधा मोफत पुरविल्या जातात.

वसतिगृहासाठी खालील प्रमाणे इमारत बांधकामासाठी शासनाकडुन जागा मंजुरीची आवश्यक्ता आहे.

१.मुलांचे शासकीय वसतिगृह, अचलपुर

२.मुलांचे शासकीय वसतिगृह, धारणी.

३.मुलींचे शासकीय वसतिगृह, वरुड.

४.मुलींचे शासकीय वसतिगृह, चांदुर बाजार.

५.मुलींचे शासकीय वसतिगृह, तिवसा.

६.मुलींचे शासकीय वसतिगृह, राठीनगर, अमरावती.

तसेच खालील प्रमाणे अमरावती जिल्हयात शासकीय वसतिगृह प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. मुलांचे शासकीय वसतिगृह, वरुड.

२.मुलांचे शासकीय वसतिगृह, मोर्शी.

३.मुलांचे शासकीय वसतिगृह, धामणगांव.

४.मुलांचे शासकीय वसतिगृह, चांदुर बाजार.

५. मुलांचे /मुलींचे शासकीय वसतिगृह, अंजनगांव सुर्जि.

६. मुलींचे शासकीय वसतिगृह ,दर्यापुर.

या प्रमाणे शासनाकडुन वसतिगृह मंजुरी अपेक्षित आहे.

| अ.क्र | योजनेचे नांव | सन | वसतिगृह संख्या | मान्य संख्या/लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | मागासवर्गीय मुलामुलींचे वसतिगृह उघडणे | २०१०-११ | १ | १०० |
| २ | | २०११-१२ | २ | २०० |
| ३ | | २०१२-१३ | १ | १०० |
| ४ | | २०१३-१४ | १ | १०० |
| ५ | | २०१४-१५ | १ | १०० |
| | | एकुण | ६ | ६०० |

## २. अनुसुचित जातीच्या लाभार्थ्यांना घरकुल योजना-

महाराष्ट्र शासनाने सन २००८-०९ अनुसुचित जातीच्या घटकांना स्वताचे घरकुल असावे या करीता महानगर पालिका स्तरावर २ लाख , नगरपालीका स्तरावर १.५ लाख व ग्रामपंचायत स्तरावर ७० हजार या प्रमाणे इमारत बांधकामासाठी निधी प्रस्तावित केलेल आहे या संदर्भात या कार्यालयाने जिल्हयामधुन अर्जाची मागणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे २५ हजार अर्ज प्राप्त झाले होते.त्यामधुन १८ हजार अर्ज पात्र ठरविण्यात आले.मा. संचालक, समाज कल्याण विभाग, पुणे यांचे कडुन तरतुदी प्राप्त झाल्यानंतर प्राप्त तरतुदी नुसार घरकुल बांधुन देण्यात येईल त्या बाबतचा नकाशा सोबत दर्शविण्यात आलेला आहे.

## ३. कर्मविर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना-

अनुसुचित जाती व नवबौध्दांकरीता ही योजना सन २००४-०५ पासुन कार्यान्वित केली असुन दारीद्रय रेषेखालील भुमिहीन शेत मजुर कुटुंबांना उदर निर्वाहाचे अन्य साधन नसल्याने व त्यांना रोजगार हमी योजना किंवा खाजगी व्यक्तीकडे मजुरी करावी लागते परिणामी त्यांच्या राहणीमाणावर प्रतीकुल परिणाम होतो. त्याचे उत्पन्नाचे स्त्रोत्र वाढावे व त्याचे राहणीमाणात बदल व्हावा, त्यांचे मजुरीवर असलेले अवलंबित्व कमी होवुन त्यांना कायम स्वरुपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे या उदेशाने ही योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेत लाभार्थी हा अनुसुचित जाती /नवबौध्द घटकातील असावा. २.दारीद्रय रेषेखालील भुमीहीन शेतमजुर असावा.३.विधवा आणि परित्यक्ता यांना प्राधान्य.४. लाभार्थी ची वयोमर्यादा १८ ते ६० पर्यत .

या योजने अंतर्गत ४ एकर कोरडवाहु किंवा २ एकर ओलीताखालील जमीन देण्यात येते.जमीन उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडुन ५०% अनुदान व ५०% बिनव्याजी कर्ज या प्रमाणात निधी उालब्ध करुन देण्यात येतो.

या योजनेत खालील प्रमाणे अमरावती जिल्हयाकरीता सन २००४-०५ ते २००९-१० पर्यत रु. २९०.५० लक्ष खर्च झाला असून जिरायत जमीन एकुण ७३४ एकर खरेदी केली असुन त्यापैकी ७१२ एकर जमीन २१६ लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आलेली आहे.

--३

| अ.क्र | योजनेचे नांव | सन | खरेदी करीता प्रस्तावित जमीन | संभाव्य लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | कर्मविर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना- | २०१०-११ | ७० | १७ |
| २ | | २०११-१२ | ८० | २० |
| ३ | | २०१२-१३ | १०० | २५ |
| ४ | | २०१३-१४ | १०० | २५ |
| ५ | | २०१४-१५ | १५० | ४० |
| | | एकुण | ५०० | १२७ |

## ४. पॉवर टिलर देण्याची योजना-

अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील अल्पभुधारक शेतकऱ्यांना १०० % अनुदानावर आधुनिक पध्दतीने शेतीचे कामे करण्यासाठी पॉवर टिलर देण्याची योजना सन २००७-०८ पासुन कार्यान्वित केलेली आहे. सदर योजने अंतर्गत जिल्हयामध्ये सन २००७-०८ मध्ये ३० पॉवर टिलरचे वाटप करण्यात आले. तसेच सन २००८-०९ मध्ये ६६ पॉवर टिलर वाटप करण्यात आले असून सन २००९-१० करीता ५२ पॉवर टिलर मंजुर करण्यात आले आहे. वाटपाची कार्यवाही ३१.८.२०१० पर्यत करण्यात येत आहे. पॉवर टिलर वाटपाची प्रक्रिया जादाचे अर्ज प्राप्त होत असल्यामुळे लाभार्थी निवड ही मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या समितीकडुन इश्वर चिठ्ठीने करण्यात येते.

| अ.क्र | योजनेचे नांव | सन | प्रस्तावित पॉवर टिलर संख्या | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | पॉवर टिलरचे वाटप करण्याची योजना | २०१०-११ | ६० | ६० |
| २ | | २०११-१२ | ७० | ७० |
| ३ | | २०१२-१३ | ८० | ८० |
| ४ | | २०१३-१४ | ९० | ९० |
| ५ | | २०१४-१५ | १०० | १०० |
| | | एकुण | ४०० | ४०० |

## ५.गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल वाटप करण्याची योजना-

सदरची योजना महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय विभागा मार्फत सन १९९७ पासुन कार्यान्वित केलेली आहे. या करीता लाभार्थी हा अनुसुचित जातीमधील चर्मकाम करणारा असावा व त्याचे उत्पन्न ग्रामिण भागाकरीता ४००००/- व शहरी भागाकरीता ५००००/- चे आंत असावे.

या कार्यालया मार्फत सन २००७-०८ मध्ये ५२ लाभार्थ्यांना गटई स्टॉल चे वाटप करण्यात आले. तसेच सन २००८-०९ मध्ये २३८ गटई स्टॉल अमरावती जिल्हयात मंजुर झाले असून २२९ चे वाटप सन २००९-१० मध्ये करण्यात आले असून ९ लाभार्थ्यांना या महिन्याचे अखेर पर्यत वाटप करण्यात येईल.

| अ.क्र | योजनेचे नांव | सन | प्रस्तावित गटई स्टॉल संख्या | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | गटई स्टॉल वाटप करण्याची योजना | २०१०-११ | ३५० | ३५० |
| २ | | २०११-१२ | ३५० | ३५० |
| ३ | | २०१२-१३ | ४०० | ४०० |
| ४ | | २०१३-१४ | ४०० | ४०० |
| ५ | | २०१४-१५ | ४५० | ४५० |
| | | एकुण | १,९५० | १,९५० |

## ६. अनुसुचित जाती उपयोजना-

केंद्र शासनाचे निर्देशानुसार सन १९८९ पासुन सदरची योजना विशेष घटक योजना आता अनु जाती उपयोजना म्हणुन राज्य शासना मार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उदेश अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांची शैक्षणिक , आर्थिक व सामाजिक सर्वांगीन उन्नती करणे आहे. अमरावती जिल्हयाकरीता सन २००९-१०करीता अनुजाती उपयोजना या करीता मंजुर नियतव्यय रु.२८३६.८३ लक्ष त्यापैकी प्राप्त तरतुद ३१२३.४८ लक्ष एवढी होती. मार्च २०१० अखेर रु.२१२०.९३ लक्ष इतका खर्च झालेला असुन खर्चाची टक्केवारी ९९.८८ टक्के इतकी आहे.

--४

**७.विजाभज आश्रमशाळा-**

शासनाने विमुक्त जाती व भटक्या जमातीचा विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहु नये म्हणुन विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रमशाळा सुरु केल्या आहेत. या विभागामार्फत अमरावती जिल्हयामध्ये एकुण १५ आश्रमशाळा कार्यरत असून २००९-१० करीता विद्यार्थी क्षमता २९७५ एवढी आहे. या आश्रमशाळेमध्ये शाळा विभाग व वसतिगृह विभाग असे दोन विभाग कार्यरत आहे. या आश्रमशाळेत इयत्ता १ ली ते १० पर्यतच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्या जातो.शासनाने सन २०७-०८ पासुन १ कनिष्ठ महाविद्यालय भारवाडी ता.तिवसा येथे सुरु केलेले आहे. तसेच ज्या ठिकाणी इयत्ता १० वी वर्ग परिपुर्ण आहे त्या ठिकाणी १ नविन कनिष्ठ महाविद्यालय प्रस्तावित करण्यात येत आहे.

**८.भारत सरकार शिष्यवृत्ती-**

अनुसुचित जाती साठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना , शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क देण्याची योजना ही सन १९५९-६० पासुन केंद्र शासनाकडुन महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. या योजने अंतर्गत अनुसुचित जाती ,विजाभज,इमाव व विमाप्र इत्यांदी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रवृत्त व्हावे तसेच त्यांनी उच्च शिक्षण घ्यावे याकरीता महाराष्ट्र शासनाने सुरु केली आहे. या योजनेचे लाभार्थी हे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील असावयास पाहिजे तसेच त्यांचे उत्पन्न १ .०० लाखा पर्यत असणे आवश्यक आहे. तसेच १.०० लाखाचे वर उत्पन्न असणाऱ्या घटकांना शिक्षण फी व परिक्षा फी माफ होण्याचे दृष्टीने सदरची योजना लागु करण्यात आलेली आहे.

अमरावती जिल्हयामध्ये सन २००९-१० पर्यत झालेल्या खर्चाची माहिती खालील प्रमाणे.

| अ.क्र | प्रवर्ग | प्राप्त तरतुद | खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अनु जाती | २१४८.७६ | २१४८.७६ | ३२४२८ |
| २ | विजाभज | ८८४.०१ | ८८४.०१ | ९८४७ |
| ३ | इमाव | २३२१.६३ | २३२१.६३ | ४२६६३ |
| ४ | विमाप्र | १२३.३८ | १२३.३८ | १८२८ |

प्रस्तावित तरतुद व खर्चाची माहिती खालील प्रमाणे.

| अ.क्र | प्रवर्ग | प्राप्त तरतुद | खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अनु जाती | २३६२.०० | २३६२.०० | ३२६२८ |
| २ | विजाभज | ९००.०० | ९००.०० | १०००० |
| ३ | इमाव | २५२१.०० | २५२१.०० | ४५५०० |
| ४ | विमाप्र | १५०.०० | १५०.०० | २५०० |

सदर तरतुदी मध्ये सन २०१०-११ ते २०१४-१५ पर्यत १० टक्के वाढ अपेक्षित आहे.

**९. ई- स्कॉलरशिप-**

भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती या योजने खाली विविध शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रस्तावाच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. सद्याच्या पध्दती नुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप बँके मार्फत विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये करण्यात येईल.असे निवेदन मा. राष्ट्रपती यांनी संसदेच्या अभिभाषणामध्ये केलेले आहे.

त्यानुसार सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीव शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क वितरण बँक मार्फत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.येत्या पुढील वर्षा मध्ये जिल्हयातील सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप बँके मार्फत अदा करण्यात येणार आहे.

**१०. अत्याचाराचे बळी ठरलेल्या अनु जाती अनु जमाती मधील कुटूंबातील सदस्यांना अर्थ सहाय्य देण्याची योजना-**

नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५ व अनुजाती जमाती (अत्याचार प्रतिबंध ) अधिनियम १९८९ अंतर्गत दिनांक १ एप्रिल १९९५ पासुन अत्याचार पिडीत व्यक्तींना शासन निर्णय दिनांक २४.९.१९९७ अन्वये गुन्हा निहाय दिलेल्या अर्थ सहाय्याचे प्रावधानानुसार अर्थ सहाय्य प्रदान केल्या जाते. या योजनेत गुन्हयाचे आवश्यक कागदपत्रे पोलीस विभागाकडुन प्राप्त केल्या जातात व अर्थ सहाय्य मंजुरीस्तव जिल्हा स्तरावर गठीत केलेल्या जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती द्वारे समितीचे अध्यक्ष मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने व मंजुरीने अर्थ सहाय्य मंजुर केल्या जाते.

--५

तरतुदी नुसार अर्थ सहाय्य कोषागारातुन आहरण व प्रदान करण्याची कार्यवाही जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचे सचिव व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी हे करतात. सदर गुन्हयाचे प्रकार खालील प्रमाणे.

१. खुन , २. लैगीक छळ (बलात्कार), ३. विनयभंग ४. मारहाण ५. जातीवाचक शिविगाळ ६. राहते घर जाळपोळ करणे ७. उभे पिक नष्ठ करणे (जातीय द्वेषातुन) या विविध अत्याचार ग्रस्त अनु जाती च्या कुटुंबांना अर्थ सहाय्य प्रदान केल्या जाते. न्यायालयाचे निकालानुसार सिध्ददोष प्रकरणात उर्वरीत अर्थ सहाय्य देण्यात येते.

या योजनेवर मागील ३ वर्षात खालील प्रमाणे तरतुद खर्च होवुन लाभार्थ्यांना अर्थ सहाय्य देण्यात आलेले आहे. सन २००७-०८ मध्ये एकुण ५.०६ लाख एवढा खर्च झालेला आहे. तसेच सन २००८-०९ मध्ये ११.०० लाख खर्च झालेला आहे. व सन २००९-१० करीता ९.५६ लाख खर्च झालेला आहे. वरील तिन्ही वर्षातील लाभार्थी संख्या ४७ एवढी आहे.

अनु जाती जमातीचे कुटुंबातील सदस्यांवर झालेल्या अत्याचाराच्या अनुषंगाने सबंधित पोलीस स्टेशन कडुन तक्रार (एफ.आय.आर.) दाखल होईल व त्यानुसार सबंधित पात्र पिडीतास अर्थ सहाय्य देण्याकरीता पोलीस विभागाकडुन आवश्यक ते कागदपत्रे प्राप्त करुन व प्रस्ताव परिपुर्ण करून घेवुन मा.जिल्हाधिकारी यांची मान्यता घेवुन सबंधित पिडीतास अर्थ सहाय्य मंजुर करण्यात येते.

**११.- अनुसुचित जाती व नवबौध्द मुलामुलींकरीता शासकीय निवासी आश्रमशाळा सुरु करणे.**

सामाजिक न्याय विभागा मार्फत अमरावती जिल्हयातील एकुण १४ तालुक्यामध्ये अनुसुचित जाती व नवबौध्द मुलामुलींकरीता शासकीय निवासी आश्रमशाळा सुरु करणे प्रस्तावित आहे.

सामाजिक व आर्थिक परिस्थिती मुळे अनुसुचित जाती व नवबौध्द मागासवर्गीय मुलामुलींकरीता प्राथमिक व माध्यमिक शाळेपर्यत शिक्षण घेता येत नाही. अशा मुला मुलींच्या शिक्षणाची मोफत सोय व्हावी म्हणुन प्रत्येक तालुक्यात १ निवासी शाळा सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निवासी शाळेमध्ये इयत्ता १ ली ते ७ वी पर्यतच्या अनुसुचित जाती व नवबौध्द मागासवर्गीय मुलामुलींकरीता प्रवेश दिल्या जाणार आहे. या निवासी शाळेत मोफत भोजन, निवास, व इतर आवश्यक त्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सद्या अमरावती जिल्हयातील धामणगांव रेल्वे,चांदुर रेल्वे, वरुड,दर्यापुर,अचलपुर, अंजनगांव सुर्जी येथील शासकीय निवासी शाळेचे बांधकाम सुरु आहे.

**१२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन निर्मिती-**

सामाजिक न्याय विभागा मार्फत अमरावती जिल्हयाकरीता कार्यरत असणारे सर्व कार्यालय तसेच १. महात्मा फुले विकास महामंडळ, २.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ, ३.संत रोहीदास चर्मोद्योक व चर्मकार विकास महामंडळ, ४.महाराष्ट्र राज्य, अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळ, ५. वसंतराव नाईक विजाभज विकास महामंडळ ६. इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ इत्यादी महामंडळे या सामाजिक न्याय भवनामध्ये कार्यरत असणार आहे. या बाबतचा नकाशा सोबत जोडण्यात आलेला आहे.(नमुना)

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ३ इमारती मध्ये विभागले असून मधील इमारत ही सांस्कृतिक हॉल करीता आहे. एका इमारती मध्ये सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असणारी सर्व वरील महामंडळे, सामाजिक न्याय जिल्हा कार्यालय, जात पडताळणी कार्यालय व इतर प्रशासकीय कार्यालये आणि दुसऱ्या इमारती मध्ये वाचनालय, संगणक कक्ष, कॉन्फरन्स हॉल, सायबर कॅफे, आर्ट गॅलरी, प्रदर्शनिय दालन इत्यादींचा अंतर्भाव या इमारतीमध्ये करण्यात आलेला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनामुळे सर्व योजनांचा लाभ जिल्हयातील शेवटच्या नागरीकांना एकाच ठिकाणी घेता येणार आहे. सामाजिक न्याय भवनाची प्रतीकृतीची छायाप्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे या कार्यालयाकडुन नमुद १ ते २१ योजना राबविल्या जातात व मागासवर्गीय घटकांना योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न हा सामाजिक न्याय विभाग करीत आहे.

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
अमरावती.

E:\Stenovision\ 2010

## विभागीयस्तरावर १००० विद्यार्थी क्षमतेचे व १०० विद्यार्थी क्षमतेची जिल्हा व तालुका स्तरावर





अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलामुलींकरीता १०० शासकीय निवासी आश्रमशाळा

- उच्च दर्जाच्या शैक्षणिक संस्था, अभ्यासक्रम (उदाहरणार्थ अभियांत्रिकी, वैद्यकीय, संगणक शिक्षण / प्रशिक्षण, व्यवस्थापन शास्त्र ) याचे केंद्रीकरण विभागीय स्तरावर झाले आहे. या ठिकाणी मागासवर्गीयांना प्रवेश घेतल्यानंतर त्यांना भोजननिवास, शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी विभागीय स्तरावरील १००० क्षमतेची शासकिय वसतिगृहे तसेच जिल्हा व तालूकास्तरावर माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाचा लाभ घेता यावा व या ठिकाणी भोजन निवासाची सोय व्हावी त्यासाठी १५० नवीन शासकीय वसतिगृह सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- शासनाने सात विभागीयस्तरावर १००० क्षमतेची वसतिगृहे व तालुका व जिल्हा स्तरावर १५० क्षमतेची १५० शासकीय वसतिगृहे प्रथम बांधण्याचा निर्णय घेतला आहे.
- विभागीय स्तरावरील १००० क्षमतेच्या वसतिगृहाची सुसज्ज इमारत बांधकामासाठी प्रत्येकी रु. २९ कोटी खर्च करण्यात येते आहे. तर जिल्हा तालुकास्तरावरील वसतिगृहाचे इमारत बांधकामा साठी ३.२७ कोटी खर्च करण्यात येत आहे.
- या वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, शेक्षणिक साहित्य, पुस्तके, इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.



# घरकुल योजना

- अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबाचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घरांच्या ठिकाणी २६९ चौरस फुटाचे पक्के घर बांधून देणारी घुरकुल योजना शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर २००८ पासून सुरू करण्यात आली आहे.
- घराच्या बांधकामासाठी क्षेत्र निहाय कमाल खर्चाची मर्यादा ग्रामीणक्षेत्र रूपये १ लाख, नगरपालिका क्षेत्र रूपये १.५० लाख व महानगरपालिका क्षेत्र रूपये २ लाख इतकी आहे.
- लाभार्थी हिस्सा ग्रामीण क्षेत्र ५ टक्के, नगरपालिका क्षेत्र ७.५० टक्के, महानगरपालिका क्षेत्र १० टक्के इतका असावा.
- ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाला लाभार्थी हिस्सा भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.
- लाभार्थ्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य १५ वर्ष असावे.
- अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण क्षेत्र रूपये १ लाख, नगरपालिका क्षेत्र रूपये १.५० लाख आणि महानगरपालिका क्षेत्र रूपये २ लाख इतके असावे.
- सदर योजनेचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल. शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

| अ.क्र. | वर्ष | प्राप्त तरतूद (रू. हजारात) | उद्दिष्ट |
|---|---|---|---|
| १ | २००८-०९ | २९२९६०० | सन ०८-०९ व ०९-१० मध्ये |
| २ | २००९-१० | ६३४८२०० | एकूण ७७, १७४ प्रस्तावित घरे |



मा.श्री.सुरेशकुमार इंगोले, अतिरिक्त जिल्हाधिकारी,
अमरावती पॉवर टिलर चे वाटप करतांना

## नविन १५० शासकीय वसतिगृहे तसेच १०० मुला-मुलींकरीता निवासी शाळा बांधण्याचे काम सुरु आहे.



१००० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वसतिगृह



**अनुसूचित जातीच्या मुलामुलींचे १०० शासकीय वसतिगृह.**

- सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे अनुसूचित जाती व नवबौद्ध मागासवर्गीय मुला-मुलींना प्राथमिक व माध्यमिक शाळांपर्यंत शिक्षण घेता येत नाही. अशा मुलामुलींच्या शिक्षणाची मोफत सोय व्हावी. म्हणून प्रत्येक तालुक्यात एक निवासी शाळा सुरु करण्याच्या निर्णय शासनाने घेतला आहे. यापैकी प्रथम १०० तालुक्यात इमारत बांधकामास मंजूरी देण्यात आली आहे. बांधकामे प्रगती पथावर आहेत.
- या निवासी शाळेच्या प्रत्येक इमारतीसाठी रुपये ४.४२ कोटी इतका खर्च करण्यात येत आहे.
- या निवासी शाळेमध्ये इ. १ली ते ७वी पर्यंतच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मागासवर्गीय मुला-मुलींना प्रवेश दिला जाणार आहे.
- या निवासी शाळेत मोफत भोजन निवास व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन



**भूमिका** - महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्याच्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन तीन इमारतीमध्ये विभागले असून मधील इमारत ही सांस्कृतिक हॉलकरीता आहे. एका इमारतीमध्ये सामाजिक न्याय भवनाच्या अंतर्गत असणारी सर्व महामंडळे, सामाजिक न्याय जिल्हा कार्यालय, जात पडताळणी कार्यालय व इतर प्रशासकीय कार्यालये आणि दुसऱ्या इमारती मध्ये वाचनालय, कॉम्प्युटर सेंटर, कॉन्फरन्स हॉल, सायबर कॅफे, आर्ट गॅलरी, प्रदर्शनीय दालन तसेच सांस्कृतिक व कल्याणकारी योजना राबविल्या जाणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवना मुळे सर्व योजनांचा लाभ जिल्ह्यातल्या शेवटच्या नागरिकांना एकाच ठिकाणी घेता येईल.

# कन्यादान योजना



- सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दांपत्यासाठी अर्थ सहाय्य देण्याचा निर्णय सन २००३ - ०४ या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे.
- महाराष्ट्रात अनुसूचित जाती (नवबौध्दांसह), विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह), विशेष मागास प्रवर्गातील आर्थिकदृष्टया कुमकुवत असलेल्या मागासवर्गीय कुटुंबातील सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या जोडप्यांना रूपये १० हजार इतके अर्थसहाय्य वधुचे वडील, आई किंवा पालकांच्या नांवे धनादेशाद्वारे लग्नाच्या दिवशी देण्यात येईल.
- सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या संस्था वा संघटनांना प्रत्येक जोडप्यामागे २ हजार रूपये असे प्रोत्साहनात्मक अनुदान २००८ पासून देण्यात येते.



# आंतरजातीय विवाह

## आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य

अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व विमुक्त जाती , भटक्या जमाती यापैकी एक व्यक्ती, सवर्ण हिंदू, जैन, लिंगायत, बौध्द, शिख या पैकी दुसरी व्यक्ती अशांनी विवाह केल्यास आंतरजातीय विवाह संबोधण्यात येतो. शासन निर्णय, दिनांक ६ ऑगस्ट२००४ अन्वये मागासवर्गातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती यामधील आंतर प्रवर्गामधील आंतरजातीय विवाहितांनाही सदर योजना लागू करण्यात आली आहे.



